# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १५/०६/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. काटोल** :– एमएच– ४०/सी.के ००१५ क्रमांकाच्या बजाज प्लसर मोटरसायकलने आरोपी चालक नामे– गौरव भगवान चांदपुरे (मृतक), वय १९ वर्ष रा. कुंभारपुरा बाजारचौक कोंढाळी हा दि. १३/०६/२२ रोजीचे रात्री २१.०० वा. ते २१.३० वा. दरम्यान सगमानगर काटोल येथील ओव्हर ब्रिजवरून काटोलच्या दिशेने जात असतांना सगमानगर पुलाजवळ रस्त्यांच्या डाव्या बाजूला असलेल्या एका काळया लालसर व कंथ्या रंगाच्या गाईला त्याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन धडक दिली. त्यामुळे गाय जागीच मरण पावली व स्वताचे मरणास आरोपी कारणीभुत ठरला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनी श्री संतोष निभोरकर पो.स्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ), ४२९ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास परिपोउपनी श्री बोळगीर मो. न.९७६५७७१९७७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर